मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.in » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दिनांक १३ मार्च २०२४ । पान १

# सांगवीत वाघेरेंच्या गावभेट दौऱ्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

## ग्रामस्थ, नागरिकांकडून वाघेरे यांचे जंगी स्वागत

**। पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**



आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या गाव भेट दौ-याअंतर्गत मावळ लोकसभा संघटक तथा पिंपरी चिंचवड शहराचे माजी महापौर संजोग वाघेरे पाटील यांनी सांगवी परिसरात भेट दिली. या झंझावाती दौऱ्यास नागरिकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला असून त्यांचे ठिक ठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी माजी आमदार ॲड. गौतम चाबुकस्वार यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, शिवसैनिक, तसेच ज्येष्ठ नागरिक, महिला आदि मोठ्या संख्येने या गाव भेट दौ-या सहभागी झाले होते. यावेळी मावळ लोकसभा मतदारसंघातून विजयासाठी सांगवीतील नागरिकांनी शब्द दिला.

यावेळी संजोग वाघेरे पाटील तुम्हीच होणार 'खासदार' असा उत्स्फूर्त प्रतिसाद नागरिकांनी आणि स्थानिक गावकऱ्यांनी दिला. सांगवीतील प्रत्येक ठिकाणी थांबून वाघेरे यांनी नागरिकांशी संवाद साधला. त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. नागरिकांनीही मनमोकळेपणाने वाघेरे पाटील यांच्याकडे आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी सांगवीतील सर्व ग्रामस्थ आणि नागरिक यांनी वाघेरे यांना खासदार करण्याचा निर्धार व्ुयक्त करत शुभेच्छा दिल्या. या दौ-यात संजोग वाघेरे पाटील यांनी संवाद साधताना मावळ लोकसभा मतदार संघाचा सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध आहे. पिंपरी चिंचवड आणि मावळ या भागातील प्रश्न सोडविण्यासाठी आपण आग्रही राहू, असे म्हटले आहे.आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या गाव भेट दौ-याअंतर्गत मावळ लोकसभा संघटक तथा पिंपरी चिंचवड शहराचे माजी महापौर संजोग वाघेरे पाटील यांनी सांगवी परिसरात भेट दिली.

# बायोमायनिंगमुळे महापालिकेस उपलब्ध होणार २५ एकर जागा

## जुन्या कचऱ्याच्या बायोमायनिंगचे ७०% काम पूर्ण

**। पिंपरी-चिंचवड।**



पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने मोशी कचरा डेपो येथील बायोमायनिंग प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्णत्वास आला आहे. सॅनिटरी लँडफिल १ येथे ८ लाख चौरस मीटर जुन्या कचऱ्याच्या बायोमायनिंगचे ७०% काम पूर्ण झाले आहे. आता दुसऱ्या टप्प्यामध्ये मोशी साईटवरील अतिरिक्त १५ लाख चौरस मीटर कचऱ्याचे बायोमायनिंग करण्यावर महापालिका लक्ष केंद्रित करणार असून नुकतेच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या कामाचा शुभारंभ करण्यात आला आहे.पिंपरी चिंचवड शहरात दैनंदिन निर्माण होणारा कचरा पुर्वीपासुन मोशी येथील कचरा डेपोमध्ये प्रक्रिया करण्याकरिता पाठविण्यात येतो. बायोमायनिंग प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर, मोशी कचरा डेपोमध्ये २५ एकर जमीन मोकळी होणार आहे. या जमिनीचा वापर भविष्यातील घनकचरा व्यवस्थापन उपक्रम आणि नागरी विकास प्रकल्पांसाठी करण्यात येणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रात मोशी येथे सॅनिटरी लँडफिल १, २ व कॅपिंग केलेल्या एकुण २५ एकर जागेत २३ लाख चौरस मीटर (८ लाख + १५ लाख) इतका जुना डंपींग केलेला कचरा आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत जुन्या डंपिंग केलेल्या कचऱ्याचे बायोमायनिंग करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. जुन्या डंपिंग केलेल्या कचऱ्याचे शास्रोक्त पद्धतीने बायोमायनिंग करताना तयार होणारे आरडीएफ सिमेंट बांधकाम कंपन्यांना देण्यात येत असून जैव माती शेती आणि गार्डनिंगसाठी वापरण्यात येत आहे. उरलेला राडारोडा सखल भागात जमीन समपातळीत करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. या प्रकल्पाबाबत बोलताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, बायोमायनिंगद्वारे पर्यावरण पुनरुज्जीवनाच्या दिशेने महापालिकेने महत्वपुर्ण पाऊल टाकले आहे. काम पुर्ण झाल्यानंतर जुन्या ३० वर्षातील साठलेल्या कचऱ्याचे शास्रोक्त पद्धतीने विघटन होणार आहे. बायोमायनिंगचे दुसऱ्या टप्प्याचे काम पुर्ण झाल्यास २५ एकर जागा घन कचरा व्यवस्थापनाच्या इतर प्रकल्पांकरीता उपलब्ध होणार आहे.

# औंध-रावेत मार्गावरील वाहतूककोंडी कमी करण्यासाठी रक्षक चौकात होणार भुयारी मार्ग

## भुयारी मार्गाच्या प्रकल्पाची नुकतीच घोषणा

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** औंध-रावेत मार्गावरील प्रवाशांची बारमाही वाहतूककोंडी कमी करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने रक्षक चौकामध्ये नवीन भुयारी मार्गाची बांधणी करण्यात येणार आहे. सदर भुयारी मार्गाच्या प्रकल्पाची नुकतीच घोषणा करण्यात आली असून रक्षक चौकातील प्रस्तावित भुयारी मार्गामुळे प्रवाशांना रहदारीसाठी सुलभता निर्माण होणार असून, यामुळे प्रवाशांचा वेळही वाचणार आहे. पिंपरी-चिंचवड आणि पुणे यांना जोडणारा औंध-रावेत पर्यंतचा १४ किलोमीटरचा रस्ता दोन्ही शहरांना जोडणारा मुख्य दुवा असल्याने यामुळे



दोन्ही भागातील वाहतूक मोठ्या प्रमाणात होते. या महत्त्वपूर्ण ट्रान्झिट कॉरिडॉरच्या मध्यभागी रक्षक चौकामध्ये प्रमुख सिग्नलयुक्त जंक्शन असल्याने प्रवाशांना सुमारे ९० सेकंद थांबावे लागते आहे. यामुळे मार्गावरील वाहतूककोंडीच्या समस्या निर्माण होऊन नागरिकांना प्रवासासाठी वेळ लागतो आहे.पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य अभियंता श्रीकांत सवणे म्हणाले, सदर प्रकल्प नागरिकांना पायाभूत सुविधा व सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमधील सुलभतेस प्राधान्य देणारा आहे. भुयारी बांधकामासाठी आम्ही पादचारी क्रॉसिंगचा विकास आणि बीआरटीएस थांब्यांपर्यंत जाण्यासाठी सुरक्षित प्रवेश या सारख्या सर्वसमावेशक घटकांचा विचार केला गेला आहे. यामुळे सामान्य नागरिकांना सर्व पातळीवर समान गतिशीलता मिळणार आहे. याबरोबर स्थानिकांकडून संबंधित समस्यांचे निराकरण करण्यासाठी व भुयारी मार्गाचे डिझाईन तसेच अंमलबजावणी प्रक्रियेसाठी प्रतिक्रियाही मागविण्यात येणावाहतूक प्रवाहात सुलभता : भुयारी मार्गामुळे वाहनांची गर्दी कमी होऊन वाहनांना ये-जा करण्यातील अडचणी दूर होतील.

वेळेची बचत : सार्वजनिक वाहतूक सुविधांचा लाभ घेणाऱ्यांसाठी प्रवासाचा कालावधी कमी होईल.

आर्थिक कार्यक्षमतेत वाढ : कमीत कमी इंधनाचा वापर होऊन आर्थिक उत्पादकता वाढेल.

सुरक्षित पादचारी क्रॉसिंग : सुरक्षित क्रॉसिंग सुलभ करण्यासाठी योग्य चिन्हांचा व सुरक्षित पर्यायांचा वापर होईल.

सार्वजनिक परिवहन यंत्रणेचे एकत्रीकरण : बीआरटीएस थांबे आणि इतर सार्वजनिक वाहतूक सुविधांमध्ये सुलभ प्रवेश, मल्टी-मॉडल मोबिलिटीला प्रोत्साहन देऊन खाजगी वाहनांवरील अवलंबत्व कमी होण्यास मदत मिळेल.

प्रवेशयोग्यता : पादचारी, सायकलस्वार आणि दिव्यांग व्यक्तींसह सर्व प्रवाशांना लागणाऱ्या गरजा पूर्ण होतील.

सामुदायिक सहभाग : स्थानिक रहिवाशांचे सल्ले, प्रतिक्रियांचा वापर करून चिंता दूर करण्यासाठी त्यांच्या मतांचा विचार घेऊन प्रकल्पाच्या डिझाईन आणि अंमलबजावणी प्रक्रियेमध्ये त्यांचा सहभाग वाढविणे.र आहेत.रक्षक चौक येथील प्रस्तावित भुयारी मार्ग प्रकल्प नुकताच अमलात आणलेल्या औंध-रावेत अर्बन स्ट्रीट स्कॅपिंग प्रकल्पामध्ये अडथळा येणार नाही. स्ट्रीट स्कॅपिंग प्रकल्पांतर्गत बांधण्यात आलेल्या पदपथाचे भुयारी मार्गासाठी होणाऱ्या बांधकाम, उत्खननाच्या कामावेळी कोणतेही नुकसान होणार नाही.

# उद्यमशीलता, उत्कृष्टता हा एक प्रवास: हर्षवर्धन पाटील

## 'दखल उद्यमशीलतेची, एक्सलन्स -२०२४' पुरस्कारांचे वितरण

**। पिंपरी-चिंचवड । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** प्रत्येक यशस्वी संघटनेच्या अथवा संस्थेच्या यशामागे कर्तृत्ववान व्यक्तींचा विशेष सहभाग असतो. अशा व्यक्तींची दूरदृष्टी, नेतृत्व आणि अथक मेहनत संस्थांना उत्कृष्टतेकडे घेऊन जातात. उत्कृष्टता ही एकदम मिळत नसते तर तो एक प्रवास असतो. त्यासाठी संपूर्ण समर्पण, चिकाटी आणि अपेक्षेपेक्षा जास्त करून दाखवण्याची प्रतिबद्धता यांचा समावेश असतो, असे प्रतिपादन नॅशनल फेडरेशन ऑफ को ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीजचे अध्यक्ष तथा पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे विश्वस्त हर्षवर्धन पाटील यांनी केले. हर्षवर्धन पाटील व उद्योजक नरेंद्र लांडगे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. पीसीईटीच्या पुणे बिझनेस स्कुलने नुकताच 'पी. बी. एस. कॉर्पोरेट एक्सलन्स



-२०२४' पुरस्कार वितरण हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या (पीसीयु) प्रभारी कुलगुरू डॉ. मणीमाला पुरी, पीबीएसचे संचालक डॉ. गणेश राव, अधिष्ठाता डॉ. मीनाक्षी त्यागी आदी उपस्थित होते.'पी.बी. एस. कॉर्पोरेट एक्सलन्स – २०२४' पुरस्काराला उदंड आणि उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. संपूर्ण देशातून पाचशे पेक्षा अधिक प्रवेशिका आल्या होत्या. नामांकन समितीत नामवंत कंपन्यांचे अध्यक्ष, संचालक आणि अधिकारी यांचा समावेश होता. यामध्ये मोस्ट इन्स्पायरिंग मॅनेजिंग डायरेक्टर, मोस्ट सक्सेसफुल सीईओ, बेस्ट सीओओ, बेस्ट सीएचआरओ ,एचआर लीडर, यंग एचआर टॅलेंट, डायव्हर्सिटी अँड इन्क्लुजन आयकॉन यांचा समावेश होता. यावेळी दिव्यांग व्यक्तींना अन संग हिरोज हा विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. डॉ. मणीमाला पुरी यांनी पीसीईटी शैक्षणिक समुहातील शिक्षण संस्था, पिंपरी चिंचवड विद्यापीठाने केलेल्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेतला. डॉ. मीनाक्षी त्यागी यांनी स्वागत केले. डॉ. गणेश राव यांनी आभार मानले.

# आमदार बच्चू कडू यांची सरकारवर नाराजी

## दिव्यांग कल्याणासाठी अर्थसंकल्पात कमी तरतूद



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** दिव्यांग कल्याण विभागाचे अध्यक्ष, आमदार बच्चू कडू यांनी दिव्यांग कल्याणासाठी अर्थसंकल्पात कमी तरतूद असल्याबाबत नाराजी व्यक्त केली. राज्याच्या सहा लाख कोटी रुपयांच्या १४०० कोटी रुपयांची तरतूद दिव्यांग कल्याणासाठी असून, प्रत्येक विभागाकडून पाच टक्के निधी दिव्यांग कल्याणासाठी वापरण्याची तरतूद लक्षात घेता सुमारे ३० हजार कोटी रुपये दिव्यांग कल्याणासाठी मिळायला हवेत, अशी भूमिका कडू यांनी मांडली.दिव्यांग कल्याण विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क, बालकल्याण संस्था यांच्यातर्फे विद्यापीठातील ज्ञानेश्वर सभागृहात विशेष राज्यस्तरीय कार्यशाळेत कडू बोलत होते. बालकल्याण संस्थेचे अध्यक्ष प्रतापराव पवार, लेफ्टनंट जनरल (निवृत्त) राजेंद्र निंभोरकर, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र कुलगुरु पराग काळकर, कुलसचिव विजय खरे, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज आणि ॲग्रीकल्चरचे अध्यक्ष दीपक करंदीकर, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे महासंचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राजेंद्र जगदाळे, दिव्यांग कल्याण विभाग आयुक्तालयाचे उपायुक्त संजय कदम, समाजकल्याण विभागाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिनेश डोके या वेळी उपस्थित होते. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दृक् श्राव्य पद्धतीने कार्यशाळेत मार्गदर्शन केले.कडू म्हणाले, की राज्यात दिव्यांगांच्या शिक्षणाची जबाबदारी शिक्षण विभागाकडे दिली पाहिजे. त्याच्या अंमलबजावणीसाठी विभागाला स्वतंत्र संचालक असायला हवा. संचालकपदी शक्यतो सैन्य दलातील माजी अधिकारी असावा. विविध क्षेत्रांत उच्च तंत्रज्ञानासंबंधी संशोधन सुरू असले, तरी जन्मतः शारीरिक अपंगत्व टाळू शकणाऱ्या संशोधनाकडे फारसे लक्ष दिले जात नाही. अपंगत्व न येण्यासाठीच्या मोहिमा राबवणे, अपंगत्व कमी करणे, अपंगांचे पुनर्वसन, उपकरणे देणे यावर सरकारचा भर असायला हवा.राज्यातील सुमारे तीन टक्के लोकसंख्या दिव्यांग आहे. त्यांच्यासाठी अनेक योजना राबवल्या जातात. दिव्यांग कल्याणासाठी स्वतंत्र विभाग असलेले महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. सामाजिक न्याय विभाग सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क यांच्याशी सामंजस्य करार करणार आहे. पुढील दोन वर्षांत तंत्रज्ञानावर आधारित दिव्यांग व्यक्ती चालवतील अशा शंभर कंपन्या उभारून प्रत्येक कंपनीत १०० दिव्यांग व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात दिव्यांग कल्याणासाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स' उभारण्यात येईल.

### दिव्यांगांच्या शिक्षणाची जबाबदारी

» त्यासाठीचा निधी दिव्यांग कल्याण विभागाकडून दिला जाणार आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. दिव्यांग कल्याण विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क, बालकल्याण संस्था यांच्यातर्फे विद्यापीठातील ज्ञानेश्वर सभागृहात विशेष राज्यस्तरीय कार्यशाळेत कडू बोलत होते. बालकल्याण संस्थेचे अध्यक्ष प्रतापराव पवार, लेफ्टनंट जनरल (निवृत्त) राजेंद्र निंभोरकर, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र कुलगुरु पराग काळकर, कुलसचिव विजय खरे, मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज आणि दीपक करंदीकर, सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्कचे डॉ. राजेंद्र जगदाळे, दिव्यांग कल्याण विभाग आयुक्तालयाचे उपायुक्त संजय कदम, समाजकल्याण विभागाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिनेश डोके या वेळी उपस्थित होते.

# साखर कारखान्यांच्या सहवीज प्रकल्पांना 'ऊर्जा!

## प्रति युनिट दीड रुपये अनुदान देण्याचा राज्य सरकारचा निर्णय

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** साखर कारखान्यांच्या सहवीज प्रकल्पांनी महावितरणला दिलेल्या विजेला वर्षभर प्रति युनिट दीड रुपया अनुदान देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे साखर कारखान्यांना दिलासा मिळाला, बंद आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापलेल्या सहवीज प्रकल्पांना 'ऊर्जा' मिळणार आहे.नुकताच काढण्यात आला आहे. राज्यातील ६२ सहकारी आणि ६० खासगी साखर कारखान्यांनी बगॅसवर आधारित सहवीज प्रकल्प उभारले आहेत. या सहवीज प्रकल्पात निर्मिती करण्यात आलेल्या विजेला महाराष्ट्र विद्युत आयोगाने प्रति युनिट ४.७५ ते ४.९९ रुपये इतका निश्चित केला आहे. हा दर उत्पादन खर्चापेक्षा कमी असल्यामुळे सहवीज प्रकल्प अडचणीत आले होते. त्यामुळे वीज खरेदी दरात वाढ करण्याची मागणी सातत्याने होत होती. राज्य सरकारच्या २०२०च्या ऊर्जा धोरणानुसार अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पाद्वारे २०२५ पर्यंत १३५० मेगावॉट वीज निर्मितीचे लक्ष्य होते. पण, अपारंपरिक विजेला किफायतशीर दर



मिळत नसल्यामुळे क्षमता असूनही अपारंपरिक वीज निर्मितीचे ध्येय गाठता येत नव्हते. शिवाय बगॅसचे दर वाढल्यामुळे उत्पादन खर्चही वाढला होता. त्यामुळे अनुदान देण्याची निकड निर्माण झाली होती.राज्य सरकारकडून मिळणारे अनुदान प्रति युनिट सहा रुपयांच्या मर्यादेत आणि एक वर्षासाठी मिळणार आहे. प्रति युनिट ६ रुपयांपेक्षा जास्त दर असलेल्या सहवीज निर्मिती प्रकल्पांना हे अनुदान मिळणार नाही. राज्य सरकारने १४ ऑक्टोबर २००८ ला ऊर्जा निर्मिती धोरण जाहीर करून बगॅसवर आधारित वीज निर्मिती प्रकल्पासाठी प्रति युनिट दर ७.५० रुपये दर दिला होता. त्यानंतर तो कमी करून प्रथम ६.५० रुपये प्रति युनिट आणि त्यानंतर ४.३५ रुपयापर्यंत खाली आणला आहे. आता साखर कारखान्यांना प्रति युनिट जास्तीत-जास्त सहा रुपये प्रती युनिट दर मिळणार आहे. सहा रुपयांपेक्षा कमी दर मिळणाऱ्या प्रकल्पांना जास्तीत-जास्त दीड रुपयांचे अनुदान मिळणार आहे. राज्यातील ६२ सहकारी आणि ६० खासगी साखर कारखान्यांनी बगॅसवर आधारित सहवीज प्रकल्प उभारले आहेत. आहे. त्यापैकी कारखान्यांनी ३३९ कोटी युनिट स्वतः साठी वापरले, तर ४७२ कोटी युनिटची महावितरण कंपनीस विक्री केली होती. वीज विक्रीतून कारखान्यांना २९४८ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळालेले होते.साखर कारखान्यांच्या सहवीज प्रकल्पांनी महावितरणला दिलेल्या विजेला पुढील वर्षभर प्रति युनिट दीड रुपया अनुदान देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे साखर कारखान्यांना दिलासा मिळाला असून, बंद आर्थिकदृष्ट्या अडचणीत सापलेल्या सहवीज प्रकल्पांना 'ऊर्जा मिळणार आहे.

# जि. प.शाळेतील विद्यार्थ्यांना 'मोडी लिपी'ची गोडी

## शालेय विद्यार्थ्यांना इंग्रजीसह विविध परदेशी भाषा शिकण्यासाठी प्रोत्साहन

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** शालेय विद्यार्थ्यांना इंग्रजीसह विविध परदेशी भाषा शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असताना सातारा जिल्ह्यातील विजयनगर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी वेगळे ठरले आहेत. या शाळेतील दुसरी ते चौथीच्या मुलांना मोडी लिपीचे धडे दिले जात असून, पाच महिन्यांत ही मुले मोडी लिपीचे लेखन-वाचन करू लागली आहेत.

सातारा जिल्ह्यातील दुष्काळी भाग असलेल्या माण तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विजयनगर शाळेत सातत्याने अभिनव प्रयोग राबवले जातात, विद्यार्थ्यांना विविध प्रकारची कौशल्ये शिकवली जातात. या शाळेतील मुख्याध्यापक बालाजी जाधव, उपशिक्षक शेशाबा नरळे यांनी दुसरी ते चौथीच्या मुलांना मोडी लिपीचे धडे देण्यास सुरुवात केली. क्रमिक अभ्यासक्रम सांभाळून




कौशल्य शिक्षणाचा भाग म्हणून हा उपक्रम राबवला जात आहे.मोडी लिपी शिकवण्याच्या उपक्रमाविषयी बालाजी जाधव म्हणाले, की गेल्या वर्षी या शाळेतील विद्यार्थ्यांना जपानी भाषा शिकवण्यात आली होती. त्याबाबत बरीच चर्चा झाल्यानंतर जपानच्या शिष्टमंडळाने शाळेला भेट देऊन जपानी भाषा शिकण्यासाठीचे साहित्य भेट दिले होते. त्याचाही वापर करण्यात आला. मोडी अभ्यासक मिळत नसल्याचे वाचनात आले होते. याबाबत अभ्यास केला असता मोडी लिपी १९६०पर्यंत वापरात होती. मात्र छपाईतील अडचणींमुळे तिचा वापर बंद झाल्याचे कळले. इतिहासातील अनेक कागदपत्रे मोडी लिपीत आहेत. त्यामुळे मोडी लिपीकडे कौशल्य शिक्षणाच्या दृष्टिकोनातून पाहून आधी स्वतः यू ट्यूबच्या साहाय्याने मोडी शिकून घेतली. त्यानंतर तिसरी ते चौथीच्या ३५ विद्यार्थ्यांना मोडी लिपी शिकवण्याचा विचार केला. त्याबाबत पालकांशी चर्चा केली असता पालकांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. साधारणपणे ऑक्टोबरपासून मोडी लिपी शिकवण्यास सुरुवात झाली. त्यानंतर टप्प्याटप्प्याने रोज दोन-तीन अक्षरे, आकार-ऊकार असे करत लेखन, वाचन सुरू झाले. अडचणी आल्यास तंत्रज्ञानाचीही मदत घेतली. तसेच ऑनलाइन उपलब्ध असलेले जुने दस्तावेज अभ्यासून काळानुरूप लेखनात झालेले बदलही मुलांनी समजून घेतले. त्यामुळे आता मुले मोडी लिपीत व्यवस्थितपणे लिहू-वाचू लागली आहेत. या शिक्षणामुळे मुलांना इतिहास, भाषेविषयी गोडी लागण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.या शाळेतील मुख्याध्यापक बालाजी जाधव, उपशिक्षक शेशाबा नरळे यांनी दुसरी

### कौशल्य शिक्षणाचा भाग

» शालेय विद्यार्थ्यांना इंग्रजीसह विविध परदेशी भाषा शिकण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असताना सातारा जिल्ह्यातील विजयनगर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी वेगळे ठरले आहेत. या शाळेतील दुसरी ते चौथीच्या मुलांना मोडी लिपीचे धडे दिले जात असून, पाच महिन्यांत ही मुले मोडी लिपीचे लेखन-वाचन करू लागली आहेत.सातारा जिल्ह्यातील दुष्काळी भाग असलेल्या माण तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा विजयनगर शाळेत सातत्याने अभिनव प्रयोग राबवले जातात, विद्यार्थ्यांना विविध प्रकारची कौशल्ये शिकवली जातात. या शाळेतील मुख्याध्यापक बालाजी जाधव, उपशिक्षक शेशाबा नरळे यांनी दुसरी ते चौथीच्या मुलांना मोडी लिपीचे धडे देण्यास सुरुवात केली. क्रमिक अभ्यासक्रम सांभाळून कौशल्य शिक्षणाचा भाग म्हणून हा उपक्रम राबवला जात आहे.

ते चौथीच्या मुलांना मोडी लिपीचे धडे देण्यास सुरुवात केली. क्रमिक अभ्यासक्रम सांभाळून कौशल्य शिक्षणाचा भाग म्हणून हा उपक्रम राबवला जात आहे.मोडी लिपी शिकवण्याच्या उपक्रमाविषयी बालाजी जाधव म्हणाले, की गेल्या वर्षी या शाळेतील विद्यार्थ्यांना जपानी भाषा शिकवण्यात आली होती. त्याबाबत बरीच चर्चा झाल्यानंतर जपानच्या शिष्टमंडळाने शाळेला भेट देऊन जपानी भाषा शिकण्यासाठीचे साहित्य भेट दिले होते. त्याचाही वापर करण्यात आला. मोडी अभ्यासक मिळत नसल्याचे वाचनात आले होते. याबाबत अभ्यास केला असता मोडी लिपी १९६०पर्यंत वापरात होती.

# रद्द झालेला बारामतीतील व्यापारांचा मेळावा होणार

## मेळावा रद्द करण्यासाठी बड्या नेत्याचा दबाव होता

**पुणे । न्यूज एक्सप्रेस मराठी।** रद्द झालेल्या व्यापारी मेळाव्यासंदर्भात ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केलेल्या वक्तव्यानंतर आता त्यांच्याच उपस्थितीमध्ये व्यापारी मेळावा घेण्याचा निर्णय बारामती येथील व्यापाऱ्यांनी घेतला. पवार यांनी वेळ दिल्यानंतर मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार असल्याचे व्यापाऱ्यांनी स्पष्ट केले. आम्हाला मेळाव्याला येणे शक्य नसल्याचे पत्र व्यापाऱ्यांनी दिल्यानंतर ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या उपस्थितीत बारामती शहरात सोमवारी होणारा व्यापाऱ्यांचा मेळावा रद्द करण्यात आला होता. 'पूर्वी असे कधी घडले नव्हते', अशा शब्दांत शरद पवार यांनी नाराजी व्यक्त केली. दुसरीकडे हा मेळावा रद्द करण्यासाठी बड्या नेत्याचा दबाव होता, अशी कुजबूज बारामतीत सुरू झाली.व्यापाऱ्यांशी त्यांच्या प्रश्नांसाठी मी



अनेक वेळा चर्चा केली, परंतु 'आम्हाला जमणार नाही' असे गेल्या पन्नास वर्षांत त्यांनी कधीच कळवले नव्हते.

हे पहिल्यांदा घडले. त्यांना बहुदा कशाचीतरी चिंता वाटत असावी. त्यामुळे कार्यक्रम न घेतलेला बरा, असे त्यांना वाटले असावे. त्यांनी समोरच्याचे ऐकूनही घ्यायचे नाही असे ठरवले, त्याची मला खंत वाटते, असा तपशील शरद पवार यांनी वकिलांच्या मेळाव्यात उघड केला होता.त्यानंतर माजी नगराध्यक्ष जवाहर शहा वाघोलीकर यांच्या निवासस्थानी व्यापारी मेळाव्याबाबत पदाधिकाऱ्यांची तातडीची बैठक झाली राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा व्यापारी मेळावा लवकरच आयोजित करण्यात येणार आहे, शरद पवार यांनी दिलेल्या तारखेनुसार मेळाव्याचे आयोजन करण्यात येईल, असे जवाहर शहा यांनी स्पष्ट केले. यापूर्वी व्यापारी मेळाव्याबाबत नियोजित बैठक घेऊन निर्णय वेळेत न झाल्यामुळे मेळाव्याला उशीर झाला, असेही त्यांनी सांगितले. या बैठकीला माजी नगराध्यक्ष सदाशिव सातव, माजी नगरसेवक सुभाष ढोले, राहुल शहा वाघोलीकर, बारामती मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष संभाजी कर्वे, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष सुशील सोमानी, नरेंद्र गुजराती, स्वप्नील मुथा, शैलेश साळुंखे, धवल वाघोलीकर उपस्थित होते.